# शिष्यवृत्तीचा फॉर्म भरण्याबाबत विद्यार्थ्यांना महत्वाच्या सुचना

## सन २०२३-२४

कॅप प्रवेशित सर्व **(SC, ST ,VJNT, OBC, SBC)** व **EBC/SEBC /EWS** धारक विद्यार्थी **FE,SE,TE,BE,ME(Regular) & Direct SE** यांना सुचीत करण्यात येते की, सन २०२३-२१२४ करीता शिष्यवृत्तीचा ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी लवकरच **https://mahadbt.maharashtra.gov.in** ही वेबसाईट सुरू होणार आहे. त्या अनुशंगाने खालील सुचना लक्षात घेऊन कॅप प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी सज्ज रहावे. जेणेकरून शिष्यवृत्तीचा ऑनलाईन फॉर्म भरण्यास विलंब होणार नाही.

**तसेच सन २०२३-२४ प्रवेशित FE च्या विद्यार्थ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाईटवर (आधार द्वारे) त्वरीत नोंदणी (Registration) करावयाचे आहे**

१. विद्यार्थ्याचा मोबाईल नंबर त्याच्या आधारशी संलग्न (लिंक) असणे व आधार बॅक खात्याशी संलग्न (**NPCI Mapping** लिंक) असणे अत्यंत गरजेच आहे.

२. महाविद्यालयात प्रवेश घेण्यापुर्वी सर्वांनी त्यांची मूळ कागदपत्रे स्कॅन करून त्याची सॉफ्ट कॉपी आपल्या ईमेल वर जतन करून ठेवावी सदर कागदपत्राची सॉफ्ट कॉपी आपल्याला शिष्यवृत्तीचा अर्ज भरताना संकेतस्थळावर अपलोड करावे लागतात तरी याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

३. शिष्यवृत्तीचा अर्ज भरताना तुम्ही जो मोबाईल नंबर आधारशी संलग्न (लिंक) अदयावत आहे. तो मोबाईल नंबर बंद ठेऊ नये. कारण शिष्यवृत्ती बाबत सर्व सुचना व ओटीपी या नंबर वर शासना मार्फत देण्यात येतात.

४. EBC/SEBC/EWS धारक विद्यार्थ्यांनी चालु वर्षाचा उत्पन्नाचा दाखला (**Income Certificate of Financial year 2022-23**) विद्यार्थ्यांनी तहसिल कार्यालयातुन मागणी करून प्राप्त करून घ्यावा.

५. ज्या **EBC/SEBC/EWS** धारक विद्यार्थ्यांना 'डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता, या योजनेकरीता फॉर्म भरायचा असेल अशा विद्यार्थ्यांनी चालु वर्षाचा अल्पभुधारक दाखला तहसिल कार्यालयातुन मागणी करून प्राप्त करून घ्यावा.

६ . ज्या विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती NPCI Mapping होत नसल्याने त्यांच्या बॅंक खात्यात अद्याप जमा झाली नाही . अशा विद्यार्थानी जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन **(इंडिया पोस्ट पेमेंट बॅंक) शिष्यवृत्ती** खाते काढावे . जेणेकरून शिष्यवृत्ती लवकरात लवकर जमा होईल .

७ . विद्यार्थ्याने महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर शिक्षण घेताना २ वर्ष गॅप किंवा त्यापेक्षा ज्यास्त खंड पडल्यास सदर विद्यार्थी हा शिष्यवृत्ती मिळण्यास अपात्र होतो याची पालकांनी व विद्यार्थ्याने नोंद घ्यावी . व विद्यार्थ्याला महाविद्यालयाची ओपन कॅटेगिरी प्रमाणे पुर्ण फी भरणे बंधनकारक आहे .

८ . सर्व विद्यार्थ्याने नेहमी महाडिबीटीच्या संकेतस्थळावरील आपले Account चेक करीत राहणे अनिवर्य आहे . तसेच आपला युजरआयडी व पासवर्ड व्यवस्थित जतन करून ठेवणे आवश्यक आहे .

९ . सर्व विद्यार्थ्याना कळविण्यात येते की शासनाचा निर्णय ३१ . ०३ . २०१६ नुसार जर विद्यार्थ्याने शिक्षण पुर्ण न करता शिक्षण अर्धवट सोडल्यास किंवा वर्गात नियमांनुसार ७५% उपस्थिती नसल्यास त्याला प्राप्त झालेली शिष्यवृत्तीची रक्कम शासनास परत दयावी लागते व महाविद्यालयाची ओपन कॅटेगिरी प्रमाणे पुर्ण फी भरणे बंधनकारक आहे याची सर्व विद्यार्थ्यानी आणि पालकांनी गांभार्याने नोंद घ्यावी नंतर याबाबत कोण्त्याही प्रकारची तक्रार चालणार नाही .

**१० . सर्व विद्यार्थी व पालक यांना कळविण्यात येते की,वरील प्रमाणे सुचनांचे पालन न केल्यास व शिष्यवृत्तीचा अर्ज न भरल्यास आपल्याला महाविद्यालयाची ओपन कॅटेगिरी प्रमाणे पुर्ण फी भरणे बंधनकारक आहे .**

- शिष्यवृत्ती अर्ज भरण्याबाबत ज्या विद्यार्थ्याना काही अडचणी असतील किंवा काही शंका असतील त्यांनी श्री . टेकावडे (मो . क . **7020116872,9604308903**) व श्री . कुलकर्णी (मो . क . **8888215432**) यांना फोनद्वारे किंवा महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये प्रत्यक्ष भेटून संपर्क साधावा .

AISSMS COLLEGE OF ENGINEERING PUNE

Ref.No.AISSMS/COE/PRIN/ 82 /23-24
Date : 06.09.2023

**Adm Officer**
AISSMS COE,PUNE

**Copy to:** 1. Main Notice Board. & College website.
2. Library Notice Board.
3. All Dept Notice Boards.
4. All HOD's for information and circulation in Class & Whatsapp group, Telegram Whatsapp Group, Telegram Group